सामना मुंबई, बुधवार, दि. ७ जुलै २०१० | ९

# तुषार सावडावकर यांना डॉक्टरेट



मुंबई - लालबाग येथील रहिवासी तुषार यशवंत सावडावकर यांनी श्रीलंकेतील दी ओपन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीमधून वास्तू ॲण्ड ॲस्ट्रॉलॉजिकल सायन्सेस या विषयावर डॉक्टरेट संपादन केली आहे. यासाठी त्यांनी 'मानवी जीवनावर गृहांचा आणि वास्तूंचा होणारा परिणाम' या विषयावरील प्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. त्यांनी योगविद्येमध्ये एम. फिल पदवी तसेच एम.बी.ए.चा अभ्यासक्रमदेखील पूर्ण केला आहे. मागील २२ वर्षे ते वास्तू व ज्योतिषशास्त्रावर अभ्यास करीत आहेत.